Times of India
11 MAR 2017

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# SUK receives 10,000 photocopy applications

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** The Shivaji University, Kolhapur (SUK) has received over 10,000 photocopy applications for and 3,000 re-evaluation application for October 2016 semester examination papers.

Controller of examination (CoE), Mahesh Kakade said, "Photocopy applications are mandatory for the re-evaluation process. Majority of students for photocopy applicants are from engineering courses. He added, "Student can apply for only two photocopy applications. So, when we say that 10,000 applications are received then it is is likely that more or less 20,000 photocopies have been received."

An SUK official from the exam department said, "After the examination results are declared and students feel that their marks have been deducted unnecessarily, they can apply for photocopy application two subjects. This generally costs Rs 150 per subject."

The official added, "If a candidate wishes to apply for re-evaluation, he can apply for the same for Rs 500 per subject. After the re-evaluation form has been processed, grievance redressal committee of respective subjects assesses their answer sheets. The committee decides whether a re-evaluation is needed. It takes around two months to complete the re-evaluation process."

Another SUK official, after the October 2015 semester result, the exam department had received as many as 8,486 re-evaluation applications. Out of the total applications received, only 3,283 students got their re-evaluation claim right." He added, "The university has to shell out Rs 18 lakh and return it to students who got their re-evaluation who claims right. The report of re-evaluation claim will be out in the coming few days."

जनसंपर्क कक्ष
11 MAR 2017 सकाळ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# व्यवसायाभिमुख शिक्षण काळाची गरज : डॉ. शिंदे

## स. ब. खाडे महाविद्यालयात पारितोषिक वितरण



कोपार्डे : येथील स. ब. खाडे महाविद्यालयाच्या वार्षिक पारितोषिक वितरण समारंभात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना उपकुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे.

कुडित्रे, ता. १० : ''नोकरीसाठी शिक्षण हा उद्देश न ठेवता व्यवसायाभिमुख होण्यासाठी ज्ञान आत्मसात करणे ही काळाची गरज बनली आहे,'' असे प्रतिपादन उपकुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी केले. कोपार्डे येथील स. ब. खाडे महाविद्यालयाच्या वार्षिक पारितोषिक वितरण समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी सांगरूळ शिक्षण संस्थेचे सचिव प्रा. जयंत आसगावकर होते.

श्री. शिंदे म्हणाले, ''येणारा काळ स्पर्धेचा आहे. प्रत्येकाला नोकरी मिळेल याची शाश्वती नाही. त्यामुळे कठोर परिश्रमाशिवाय पर्याय नाही. विविध स्पर्धा परीक्षांत युवती आघाडीवर आहेत. युवकांनीही त्यांचा आदर्श घ्यायला हवा.''

या वेळी शिवाजी विद्यापीठाच्या विविध संघांत निवड झालेल्या तसेच राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर निवड झालेल्या खेळाडूंचा सत्कार झाला. प्राचार्य डॉ. डी. डी. कुरळपकर यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. डॉ. अभिजित वणिरे यांनी अहवालवाचन केले. प्रा. सुहास राऊत व प्रा. शिल्पा कांबळे यांनी सूत्रसंचालन केले. कार्यक्रमाला शिवाजी विद्यापीठाचे क्रीडा विभागप्रमुख डॉ. पी. टी. गायकवाड, केशवराव जाधव, डी. जी. खाडे, प्रा. आर. एन. पाटील, डॉ. बी. के. काटकर आदी उपस्थित होते. प्रा. बी. आय. आवटे यांनी आभार मानले.

पुढारी जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
11 MAR 2017

# 'केआयटी'मध्ये उद्योगभूषण शिवाजीराव देसाई स्मृती व्याख्यानमाला

कोल्हापूर (प्रतिनिधी) : केआयटी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगमध्ये उद्योगभूषण कै. शिवाजीराव देसाई स्मृती व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले आहे. बुधवारी (दि. १५) 'आनंदाचे आबारु मांडू जगा' या विषयावर जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी इंद्रजीत देशमुख यांचे व्याख्यान होणार आहे. केआयटी कॉलेजच्या सेमिनार हॉल येथे दुपारी साडेतीन वाजता व्याख्यान होणार आहे. या कार्यक्रमास शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, श्रीमती शशीताई देसाई आदी उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रम सर्वांसाठी खुला असल्याचे कळवण्यात आले आहे.

तरुण भारत
11 MAR 2017
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# बुधवारी कै. शिवाजीराव देसाई स्मृती व्याख्यानमाला

**कोल्हापूर :** केआयटीच्या कॉलेज ऑफ इंजिनियरिंग व शिवाजी विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने बुधवारी १५ रोजी दुपारी तीन वाजता कॉलेजच्या हॉलमध्ये, उद्योगभूषण स्व. शिवाजीराव देसाई स्मृती व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले आहे. जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी इंद्रजीत देशमुख यांचे ,'आनंदाचे आवारू मांडू जगा" या विषयावर व्याख्यान होणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर हे आहेत. प्रमुख उपस्थिती केंआयटीचे चेअरमन सचिन मेनन, उद्योगभूषण कै. शिवाजीराव देसाई प्रतिष्ठानचे अध्यक्षा श्रीमती शशीताई देसाई यांची राहणार आहे.

जनसंपर्क कक्ष
11 MAR 2017 लोकमत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कुलगुरू चषक मुंबई विद्यापीठाकडे

## विद्यापीठ कर्मचारी टी-२० : सावित्रीबाई फुले विद्यापीठाचा पराभव

**कोल्हापूर** : अखिल महाराष्ट्र विद्यापीठ कर्मचारी 'कुलगुरू चषक टी-२०' स्पर्धेच्या शुक्रवारी झालेल्या अंतिम सामन्यात मुंबई विद्यापीठ कर्मचारी संघाने पुण्याच्या सावित्रीबाई फुले विद्यापीठ संघाचा पाच गडी राखून पराभव करीत स्पर्धेचे सलग चौथ्यांदा अजिंक्यपद पटकाविले.

शिवाजी विद्यापीठाच्या मैदानावर झालेल्या या अंतिम सामन्यात प्रथम फलंदाजी करताना सावित्रीबाई फुले विद्यापीठ (पुणे) संघाने २० षटकांत ६ बाद १३८ धावा केल्या. यात सुनील माटेने ४३, मनीष गायकवाडने ३६, नितीन प्रसादनने ३३ धावा केल्या. गोलंदाजी करताना मुंबई संघाकडून संजय पवारने २, मनोहर माने व चंद्रकांत दासगांवकर यांनी प्रत्येकी एक बळी घेतला.

उत्तरादाखल खेळताना मुंबई संघाने १८.१ षटकांत ५ बाद १३९ धावा करीत सामना व विजेतेपदावर शिक्कामोर्तब केले. यात मनोहर माने यांनी अष्टपैलू खेळी करीत गोलंदाजीबरोबरच फलंदाजीमध्येही नाबाद २८ धावा केल्या; तर संजय भालेराव याने ३६, चंद्रकांत दासगांवकरने २३, संजय पवारने २० धावा केल्या. गोलंदाजी करताना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ संघाकडून सुनील माटे व विनोद नरके यांनी प्रत्येकी २ बळी, तर संतोष सुगावे याने १ बळी घेतला. 'सामनावीर' म्हणून मुंबई संघाच्या संजय भालेराव यास गौरविण्यात आले.

स्पर्धेचा बक्षीस समारंभ शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे व माजी रणजीपटू व 'केडीसीए'चे माजी अध्यक्ष ऋतुराज इंगळे यांच्या हस्ते झाला. यावेळी विद्यापीठ परीक्षा नियंत्रक महेश काकडे, क्रीडा विभागप्रमुख डॉ. पी. टी. गायकवाड, शिवाजी विद्यापीठ सेवक संघाचे अध्यक्ष बाबा सावंत, आदी उपस्थित होते. स्पर्धेचे संयोजन मिलिंद भोसले, अतुल ऐतवडेकर, रमेश ढोणुक्षे, सागर पवार, विश्वनाथ वरुटे, बाळासाहेब बांदवडेकर, सुशांत भोसले, ग्रॅबीएल रॉड्रिग्ज, अनिल साळोखे, विशाल सोनवणे, आदींनी केले.



कोल्हापुरातील शिवाजी विद्यापीठ येथे अखिल महाराष्ट्र विद्यापीठ कर्मचारी 'कुलगुरू चषक टी-२०' स्पर्धेच्या अंतिम सामन्यात विजयी ठरलेल्या मुंबई विद्यापीठाच्या कर्मचारी संघास विजेतेपदाचा चषक शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

### उत्कृष्ट खेळाडू असे...

स्पर्धेतील उत्कृष्ट गोलंदाज - विश्वनाथ वरुटे (शिवाजी विद्यापीठ), उत्कृष्ट फलंदाज - नितीन प्रसाद (सावित्रीबाई फुले विद्यापीठ, पुणे), उत्कृष्ट यष्टिरक्षक - सुशील सावंत (मुंबई विद्यापीठ), मालिकावीर - मनीष गायकवाड (सावित्रीबाई फुले विद्यापीठ, पुणे).

11 MAR 2017 सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कुलगुरू चषकावर मुंबई विद्यापीठाची मोहर

## विजेतेपदावर चौथ्यांदा कब्जा ; सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ उपविजेते

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १० : अखिल महाराष्ट्र विद्यापीठ कर्मचारी कुलगुरू चषक टी-२० क्रिकेट स्पर्धेत मुंबई विद्यापीठाने चौथ्यांदा विजेतेपदावर आपले नाव कोरले. मुंबईने पुण्याच्या सावित्रीबाई फुले विद्यापीठावर पाच गडी राखून विजय मिळविला. शिवाजी विद्यापीठाच्या क्रीडांगणावर नेटक्या संयोजनात स्पर्धा झाली.

फुले विद्यापीठाने प्रथम फलंदाजी करताना २० षटकांत सहा बाद १३८ धावा केल्या. फुले विद्यापीठाकडून सुनील माटेने ४३, तर मनीष गायकवाडने ३६ धावा केल्या. मुंबईकडून संजय पवारने दोन, तर संजय भालेरावने एक गडी बाद केला. प्रत्युत्तरादाखल मुंबई विद्यापीठाने १८.१ षटकांत पाच गडी गमावून १३९ धावा फटकावून सामना जिंकला. संजय भालेरावने ३६, तर मनोहर मानेने नाबाद २८ धावा फटकावून उपयुक्त खेळी केली. फुले विद्यापीठाकडून सुनील माटे व विनोद नारकने प्रत्येकी दोन गडी बाद केले.

कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे माजी अध्यक्ष ऋतुराज इंगळे व परीक्षा नियंत्रक महेश काकडे यांच्या हस्ते बक्षीस वितरण झाले. या प्रसंगी शिवाजी विद्यापीठ सेवक संघाचे अध्यक्ष बाबा सावंत, डॉ. पी. टी. गायकवाड उपस्थित होते. मिलिंद भोसले, अतुल ऐतवडेकर, रमेश ढोणुक्षे, सागर पवार, विश्वनाथ वरूटे, राजू कोळी, बाळासाहेब बांदिवडेकर, गॅब्रियल रॉड्रिक्स, विशांत भोसले, अनिल साळोखे, विशाल सोनवणे यांनी संयोजन केले.

### उत्कृष्ट असे

- मालिकावीर : मनीष गायकवाड (सावित्रीबाई फुले विद्यापीठ, पुणे)
- सामनावीर : संजय भालेराव (मुंबई विद्यापीठ)
- फलंदाज : नितीन प्रसाद (सावित्रीबाई फुले विद्यापीठ, पुणे)
- गोलंदाज : विश्वनाथ वरूटे (कुलगुरू इलेव्हन)
- यष्टीरक्षक : सुशील सावंत (मुंबई विद्यापीठ)

### हलगी, घुमक्याचा मैदानात ठेका

फुले विद्यापीठ व मुंबई विद्यापीठाच्या खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी मैदानात हलगी, घुमक्याचा ठेका सुरू होता. चौकार-षटकारांवर ठेका सुरू होताच खेळाडू अक्षरशः नाचत होते. तसेच गडी बाद झाल्यानंतरही त्यांच्या उत्साहाला उधाण येत होते. मुंबई विद्यापीठ विजयी होताच हलगीच्या ठेक्यावर खेळाडूंनी मैदानातच बेधुंद नृत्य केले. तसेच शिवाजी विद्यापीठाने केलेल्या नियोजनाची स्पर्धेतील सहभागी विद्यापीठातील क्रिकेटपटूंनी प्रशंसा केली.



कोल्हापूर : अखिल महाराष्ट्र विद्यापीठ कर्मचारी कुलगुरू चषक टी-20 क्रिकेट स्पर्धेतील विजेता मुंबई विद्यापीठाला चषक देताना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे. शेजारी मान्यवर.

11 MAR 2017 पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'कुलगुरू चषक' मुंबई विद्यापीठ कर्मचारी संघाकडे

## सावित्रीबाई फुले विद्यापीठ उपविजेता: अ.भा. महाराष्ट्र आंतर विद्यापीठ कर्मचारी टी-२०

**कोल्हापूर : क्रीडा प्रतिनिधी**

अटीतटीच्या अंतिम सामन्यात पुण्याच्या सावित्रीबाई विद्यापीठाचा पाच विकेट्सनी पराभव करून मुंबई विद्यापीठ संघाने अखिल महाराष्ट्र विद्यापीठ कर्मचारी 'कुलगुरू चषक' टी-२० क्रिकेट स्पर्धेचे अजिंक्यपद पटकाविले. महत्त्वाचे म्हणजे ही पाचवी स्पर्धा असून त्यापैकी मुंबई संघाने चारवेळा अजिंक्यपद मिळविले आहे. पुण्याच्या सावित्रीबाई फुले विद्यापीठ संघाला दुसऱ्यांदा उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले.

शनिवारी अंतिम सामना मुंबई विद्यापीठ विरुद्ध सावित्रीबाई फुले विद्यापीठ पुणे यांच्यात झाला. प्रथम फलंदाजी करत पुणे संघाने २० षटकांत ६ बाद १३८ धावा केल्या. त्यांच्या सुनील माटेने ४३, मनीष गायकवाडने ३६, नितीन प्रसादने ३३, दीपक गजरमलने १६ धावा केल्या. उत्तरादाखल फलंदाजी करताना मुंबईने १८.१ षटकांत ५ बाद १३९ धावांसह विजय साजरा केला.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ आयोजित 'कुलगुरू चषक' टी-२० क्रिकेट स्पर्धेतील विजेत्या मुंबई संघाला गौरविताना माजी रणजीपटू ऋतुराज इंगळे, कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, महेश काकडे, बाबा सावंत आदी. (छाया : पप्पू अत्तार)**

बक्षीस समारंभ जिल्हा क्रिकेट असोसिएशन (केडीसीए) चे माजी अध्यक्ष व माजी रणजीपटू ऋतुराज इंगळे यांच्या हस्ते आणि शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली झाला. यावेळी परीक्षा नियंत्रक महेश काकडे, विद्यापीठ सेवक संघाचे बाबा सावंत, क्रीडा विभाग प्रमुख डॉ. पी.टी. गायकवाड आदी उपस्थित होते.

**स्पर्धेतील उत्कृष्ट खेळाडू...**

**मालिकावीर :** मनीष गायकवाड (पुणे) : २४३ धावांसह १० विकेट्स

सामनावीर : संजय भालेराव (मुंबई) : ३६ धावा एक विकेट

**उत्कृष्ट गोलंदाज :** विश्वनाथ वरुटे (कोल्हापूर) : ४ सामने हॅट्ट्रिकसह १० विकेट्स

**उत्कृष्ट फलंदाज :** नितीन प्रसाद (पुणे) : ३१५ धावा

**उत्कृष्ट यष्टीरक्षक :** सुशील सावंत (मुंबई).

11 MAR 2017

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

तरुण भारत

# प्रा. अनुराधा गुरव यांच्या अमृतमहोत्सवी सोहळयाचे आयोजन

कोल्हापूर : ज्येष्ठ लेखिका प्रा. अनुराधा गुरव यांच्या ७५ व्या वाढदिवसानिमित्त त्यांचा गौरव करण्यासाठी स्थापन केलेल्या सत्कार समितीची बैठक बुधवारी झाली. अध्यक्षस्थानी प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग हाऊसचे चेअरमन डी. बी. पाटील होते.

या सोहळयात 'प्रा. अनुराधा गुरव : व्यक्ती आणि वाङःमय" या प्रा. डॉ. अर्जुन चव्हाण यांनी संपादित केलेल्या गौरव ग्रंथाचे प्रकाशन त्रिपुरा व बिहारचे माजी राज्यपाल डॉ. डी. वाय. पाटील यांच्या अध्यक्षतेखाली व माजी केंद्रीय ऊर्जामंत्री सुशीलकुमार शिंदे यांच्या हस्ते होणार आहे. याप्रसंगी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, सिंबायसीस विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. माणिकराव साळुंखे, तसेच ज्येष्ठ शिक्षणतज्ञ डी.बी. पाटील उपस्थित राहणार आहेत.

दरम्यान, सत्कार सोहळयाच्या नियोजनासाठी झालेल्या बैठकीत प्रा. अनुराधा गुरव, गौरव ग्रंथाचे प्रमुख संपादक प्रा. डॉ. अर्जुन चव्हाण, संपादक मंडळाचे सदस्य डॉ. विश्वनाथ भोसले, माजी प्राचार्य डॉ. जी. पी. माळी, न्यू कॉलेजचे उपप्राचार्य प्रा. टी. के. सरगर, प्रा. गितांजली गुरव, सौ. गौरी भोगले, प्रा. विलास शेंडगे उपस्थित होते. प्रा. गुरव यांच्या सत्कार सोहळ्यानिमित्ताने बेंगलोर येथील नॅक समितीचे सल्लागार डॉ. जगन्नाथ पाटील यांनी यानिमित्त अनुराधा गुरव यांच्या नावे एक लाख रूपयांचा निधी देण्याचे घोषित केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

11 MAR 2017 तरुण भारत

# डॉ. माळींच्या साहित्यांमधून समाजातील चांगुलपणाचे दर्शन

## ज्येष्ठ साहित्यिक डॉ. सुनीलकुमार लवटे यांचे प्रतिपादन : केएमसी महाविद्यालयातर्फे जी. पी. माळी यांचा सत्कार

प्रतिनिधी
कोल्हापूर

अध्यापन, लेखन आणि वक्तृत्व या माध्यमातून प्रा. डॉ. झी. पी. माळी यांनी समाजातील चांगुलपणाचे दर्शन घडविले. प्रतिकूल परिस्थितीवर मात करत जीवन फुलविणाऱ्या डॉ. माळी यांच्या लेखनातून कृतज्ञतेचा भाव आणि नव निर्मितीची ध्यास आढळतो, असे प्रतिपादन साहित्यिक डॉ. सुनीलकुमार लवटे यांनी केले. येथील यशवंतराव चव्हाण महाविद्यालयाच्या (केएमसी) मराठी विभागचे प्रमुख व माजी प्राचार्य डॉ. माळी हे ३६ वर्षांचा शैक्षणिक प्रवास संपवून सेवानिवृत्त झाले. यानिमित्त केएमसी महाविद्यालयातर्फे शुभचिंतन समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी डॉ. लवटे बोलत होते. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुरेश गवळी होते.

प्राचार्य गवळी यांच्या हस्ते प्रा. माळी यांचा तर उपप्राचार्या एस. व्ही. बडसकर यांच्या हस्ते पार्वती माळी यांचा सत्कार करण्यात आला. यानंतर ज्येष्ठ साहित्यिक डॉ. लवटे यांच्या हस्ते माळी यांच्या 'पुन्हा स्मृतिगंध' या पुस्तकाच्या दुसऱ्या आवृत्तीचे प्रकाशन करण्यात आले.



कोल्हापूर : यशवंतराव चव्हाण कॉलेजमधील (केएमसी) मराठी विभाग प्रमुख डॉ. जी. पी. माळी यांचा सेवानिवृत्तीनिमित्त सत्कार करताना प्राचार्य डॉ. सुरेश गवळी. सोबत सौ. पार्वती माळी व उपप्राचार्या एस. व्ही. बडसकर आदी.

समीक्षक डॉ. ल. रा. नसिराबादकर यांनी माळी यांच्या लेखनाची वैशिष्ट्ये अधोरेखित केली. ते म्हणाले, सहज सोपी भाषा, सामान्य माणसातील वेगळ्या पैलूंचे व्यक्तीचित्रण, सकारात्मक विचार आणि समाजाप्रती कृतज्ञता ही त्यांच्या लेखनाची वैशिष्ट्ये आहेत. माळी यांना साहित्य, सांस्कृतिक, समाजकारण अशा विविध क्षेत्रातील व्यक्तींचा सहवास लाभला. त्यांनी जीवनातील वेगवेगळ्या टप्प्यातील संघर्ष, जीवन विषयक अनुभव, थोरा मोठ्यांचा सहवास शब्दबध्द केला. जीवनात सकारात्मक दृष्टीकोन ठेवून वाटचाल केली आणि तेच पुस्तक रुपातून मांडले."

प्राचार्य गवळी यांनी कॉलेजमधील मराठी विभागाचा नावलौकिक उंचावण्यात माळी यांचा मोठा वाटा असल्याचे सांगताना लेखन आणि साहित्य विषयक कार्यक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची गोडी लावल्याचे नमूद केले.

यावेळी ॲड. अजित सूर्यवंशी, एस. व्ही. माळी, बेळगावचे राजाभाऊ पाटील, प्रा. विश्वास तडसरे, प्रा. संभाजी गोरे, डॉ. प्रकाश इनामदार, प्राचार्य प्रवीण चौगुले, डॉ. हरिष भालेराव, प्राचार्य डी.डी. मगदूम, डी. ए. देसाई, गुरूराज बेळुडंगी, अनुराधा कुलकर्णी, मोहन पाटील, श्याम कुरळे जितेंद्र हराळे, प्रा. ए.टी. चौगुले आदींनी मनोगत व्यक्त केले.

प्रा. राजेंद्र कोळेकर यांनी सूत्रसंचालन केले. कार्यक्रमाला शिवाजी विद्यापीठाचे माजी परीक्षा नियंत्रक डॉ. बी. एम. हिर्डेकर, प्राचार्य हिंदुराव पाटील, प्राचार्य हरिभाऊ वनमोरे, प्रा. बाबासाहेब पोवार आदी उपस्थित होते.